PUNE RESEARCH WORLD ISSN 2455-359X
AN INTERNATIONAL JOURNAL OF INTERDISCIPLINARY STUDIES VOL 5, ISSUE 1

# स्त्री शिक्षणाची वाटचाल

**डॉ. एस. एन. बरडे**
सहयोगी प्राध्यापक
जनता शिक्षण महाविद्यालय चंद्रपूर
**(महाराष्ट्र) भारत**

भारतातील समाजाचा जर विचार केला तर आपल्याला भारतीय समाजात पुरूष प्रधान संस्कृतीचा वरचश्मा दिसून येतो. प्राचीन काळापासून स्त्रीयांना दुय्यम स्थान दिल्या गेले आहे. स्त्री आणि पुरूष ह्यांच्यात नेहमीच भेदभाव केल्या गेलेला आहे. आजही आपणास हा फरक दिसून येतो. बऱ्याच वर्षापासून स्त्री आणि पुरूष यांच्यातील फरकाची व्याख्या ही सामाजिक दृष्टीकोनातूनच केली आहे, लैंगिकतेच्या दृष्टीकोनातून केली आहे त्यामुळे त्यात एकप्रकारची विकृतता आढळून येते. यात पुरूषांना नेहमीच उच्च स्थान दिल्या गेले व स्त्रीयांना खालच्या दर्जाचे स्थान देण्यात आले. भारतीय संविधानानुसार स्त्री आणि पुरूषांना समान अधिकार देण्यात आले आहे. त्यांना संधी आणि संरक्षण याबाबतीत समान हक्क आहे.

प्रत्येक व्यक्तीकडे मग ती स्त्री असो वा पुरूष काही जन्मजात गुण वा योग्यता असतात. त्या गुणांचा व योजनांचा विकास हा शिक्षणामुळेच होतो. समाजातील दुर्बल स्त्रीयांना समानतेच्या पातळीपर्यंत वर आणण्यासाठी त्यांचा सामाजिक स्तर व आर्थिक दर्जा उंचावण्यासाठी शैक्षणिक संधीचे वाटप पुरूषांसारखेच समप्रमाणात होणे आवश्यक आहे हे आपल्या समाजसुधारकांनी हेरले होते. आणि त्याप्रमाणे अथक परिश्रम करून समाजसुधारकांनी स्त्रीयांना शिक्षणाच्या माध्यमातून तो दर्जा प्राप्त करून दिला. ह्याची मुहुर्तमेढ महात्मा फुलेंनी रोवली. या कार्यात सावित्रीबाई फुले, राजश्री शाहु महाराज, बाबासाहेब आंबेडकर, महर्षि

कर्वे, कर्मवीर भाऊराव पाटील अशा अनेकांनी महत्वाचे व मोठे योगदान दिले आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापासून सामाजिक विषमता नष्ट करण्यासाठी प्रयत्न केल्या जात होते. परंतु स्वातंत्र्यप्राप्ती नंतर ह्या प्रयत्नांना अधिक गती प्राप्त झाली असे म्हणता येईल. स्त्री शिक्षणासंबंधी विचार करतांना आपल्या समोर अनेक प्रश्न निर्माण होतात. स्त्री शिक्षण संदर्भात कालची शिक्षण पद्धती उद्याची गरज पूर्ण करू शकेल काय? प्रचलीत शिक्षण पद्धतीतून स्त्री शिक्षण संदर्भाच्या किती अपेक्षा पूर्ण होतात? आजच्या शिक्षण प्रणालीतून खरोखर स्त्रीयांच्या मनात समाजाशी बांधिलकी निर्माण होत आहे काय? मुलींमध्ये शिक्षणासंबंधी औत्सुक्य, प्रेरणा आणि उत्साह किती प्रमाणात निर्माण होत आहे? देश घडणीत त्यांच्या योगदानाची दखल घेतली जाते काय? या सर्वांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न केला तर बरेचदा उदासिनता, निराशा आढळून येते. आजचा समाज भ्रष्टाचाराने भरबटलेला दिसतो. वर्तमानपत्रे किंवा समाज माध्यमांमधून खून, बलात्कार, भ्रष्टाचार, अपहरण, देशद्रोही कारवाया, सायबर क्राईम्स अशाच बातम्यांचा भर दिसून येतो. कायदा आणि स्त्रीयांसाठी असणारे शैक्षणिक धोरण यांचा समाजिक कृती बदलण्यास फारसा उपयोग होत नाही हे स्त्रीयांवरील अत्याचाऱ्यांच्या बातम्या ऐकून लक्षात येते. कुटूंबावर संस्कार करणारी प्रमुख व्यक्ती म्हणजे स्त्री होय. स्त्रीला जर योग्य शिक्षण मिळाले तर कुटूंबाला सावरण्याची शक्ती स्त्रीयांमध्ये निर्माण होईल. स्त्रीयांच्या सबलीकरणातून समाजाचा पर्यायाने देशाचा विकास साधता येईल. म्हणून स्त्रीयांना आपले जीवन सुखकर जगण्यासाठी जे शिक्षण दिले जाते ते जीवनाभिमूख शिक्षण असेही म्हणता येईल. शिक्षणातून, संस्कारातून मुलींचे व्यक्तीमत्व विकसित व्हावे ह्या दृष्टीने स्त्री शिक्षणात काळानुरूप बदल करण्यात आले. येणाऱ्या नवीन शैक्षणिक धोरणात हे बदल अपेक्षित आहेत. स्त्रीयांचे शिक्षण मुख्यतः त्यांचे समाजामध्ये कोणते स्थान आहे यावर अवलंबून असते. ह्या स्थानामध्ये बदल झाला की शैक्षणिक सोयी सुविधांमध्येही बदल होतो. आणि शिक्षणाच्या सोई सुविधा वाढल्या की स्त्रीयांच्या दर्जा मध्ये बदल घडून येतो. एकोणविसाव्या शतकात स्त्रीयांवर अनेक प्रकारची बंधने होती, त्यामुळे शिक्षणापासून त्या वंचित होत्या. कुटूंबातून जे काही शिक्षण मिळायचे, त्यावरच त्यांना समाधान मानावे लागत असे. एकोणविसाव्या शतकाच्या शेवटी महाराष्ट्रात मुलींना शिक्षण देणाऱ्या एकुण 835 संस्था होत्या व त्यातून जवळपास 80,000 मुली शिक्षण घेत होत्या. पुढच्या म्हणजे विसाव्या शतकात ही परिस्थिती बदलली. दोन महायुद्धे झाली. भारतात राजकीय, सामाजिक जागृती आणि शिक्षणाचे सार्वत्रिकरण झाले. स्त्रीयांवरची बंधने शिथिल व्हायला सुरवात झाली. याचा परीणाम असा झाला जेंव्हा आपला देश स्वतंत्र झाला तेंव्हा शिक्षण देणाऱ्या संस्थांची संख्या 25 पटीने वाढली व शिक्षण घेणाऱ्या मुलींच्या संख्येत सहा पटीने वाढ झाली.

स्वातंत्र्योत्तर काळातील जनगणनेनुसार झालेले स्त्री साक्षरतेचे प्रमाण खालील प्रमाणे आहे.

| जनगणना वर्ष | स्त्री साक्षरतेचे प्रमाण (टक्केवारी) |
|---|---|
| 1951 | 8.86% |
| 1961 | 15.35% |
| 1971 | 21.97% |
| 1981 | 29.76% |
| 1991 | 39.29% |
| 2001 | 53.67% |
| 2011 | 65.46% |

वरील जनगणनेनुसार स्त्री साक्षरतेचे प्रमाण किंवा टक्केवारी बघितली तर स्त्री शिक्षणाची होणारी नेत्रदिपक वाटचाल लक्षात येते. स्त्री साक्षरतेचा आलेख वाढतच गेलेला दिसून येतो.

आजची स्त्री सर्वच क्षेत्रे पादक्रांत करतांना दिसून येत आहे. महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या मूली असोत, गृहीणी असोत किंवा नोकरी करणाऱ्या, व्यवसाय करणाऱ्या स्त्रीया असो प्रत्येक जण आपापल्या क्षेत्रात भरीव योगदान देत आहे. आज शिक्षणासोबतच स्त्रीया या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करीत आहे. या आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून स्वतःच्या व्यक्तिमत्वाचा विकासही करीत आहे. स्त्रीयांचे साक्षरतेचे प्रमाण किंवा टक्केवारीत जरी वाढ होत असली तरी 2001 च्या जनगणनेनुसार महीलांच्या संख्येत लक्षणिय घट झाल्याचे आढळून आले. स्त्रीयांच्या संख्येतील ही घट म्हणजे निसर्गाचा समतोल बिघडविण्याचे दृष्कृत्यच म्हणावे लागेल. ही अतिशय गंभीर बाब आहे. गर्भजल परीक्षणाचा दुरूपयोग केल्या जातो. कायद्याने जरी ह्यावर प्रतिबंध असला तरी निसर्गाचा हा समतोल बिघडणार नाही. याबाबतीत प्रत्येक नागरीकाने जागरूक असणे आवश्यक आहे. ह्यासाठी अनेक संघटनांनी पुढाकार घेवून कायद्यांचा आधार घेवून स्त्री भृण हत्येच्या प्रमाणावर अंकुश ठेवणे गरजेचे आहे. एकविसाव्या शतकात प्रवेश करून जवळपास वीस वर्षे झाली आहेत. ह्या कालावधीत स्त्रीशिक्षणाची वाटचाल आशादायी नक्कीत म्हणावी लागेल. परंतु स्त्री–साक्षरतेचे प्रमाण वाढविण्याबरोबरच स्त्रीयांना सामाजिक, नैतिक, बौद्धिक, वस्तुनिष्ट पातळीवर वाटा मिळणे अत्यावश्यक आहे. असे एकही क्षेत्र उरलेल नाही ज्या क्षेत्रात स्त्रीयांनी भरारी घेतलेली नाही. प्रत्येक क्षेत्रात त्यांनी

आपली क्षमता, आपले कर्तुत्व दाखवून दिले आहे. परंतु आजही असे वाटते की, ग्रामीण, आदीवासी, नक्षलग्रस्त भागातील स्त्रीया या आपल्या स्वातंत्र्यासाठी स्वतः सक्षम झालेल्या नाहीत. सत्तेमध्ये वाटा जरी दिला गेला तरी त्याचा उपभोग ते किती घेतात किंवा त्यांच्या नावाखाली संबंधित पुरूष वर्ग सत्तेचा उपभोग घेतात हे बऱ्याच राजकीय उदाहरणांचा दाखला घेतल्यास लक्षात येते. कोणाच्याही आधारावर अवलंबून असण्याची स्त्रीयांची मानसिकता आम्हा पुरषांनी स्त्री शिक्षणाच्या माध्यमातून बदलविणे गरजेचे आहे. ती स्वतः किती स्वयंपूर्ण आहे. स्वयंसिद्धा आहे याची प्रचिती तिला आली पाहीजे. आम्हा सर्वांच्या सहकार्याने ती येणाऱ्या अनेक युगातील आव्हानांना पेलू शकेल याबाबत शंका घेण्याचे कारणच नाही.

## संदर्भ

(1) www.longdown.org
(2) https : cevicesinl/gov.in